आपको कोई
रोकने वाला
नहीं है जब
तक आप खद
से नहीं रुकते

dainiklokaarambh@gmail.com

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ८ फेब्रुवारी २०२५ | अंक६१ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

# महाराष्ट्राच्या मुलीत तुम्हाला तुमची मुलगी दिसत नाही का ? मनोज जरांगे

## मुलीची दहावीची परीक्षा झाली नाही म्हणून ते सागर बंगल्यावरुन वर्षावर गेलेले नाहीत


### सर्वांची ईडीची चौकशी करावी

त्या डॉक्टरची देखील चौकशी का केली नाही ? अनेक जण बाहेर आहेत, मग तुम्ही धरले कोणाला? फडणवीस यांना आनंदाची गादी आमच्यामुळे मिळाली आहे. येत्या चार्जशिटमध्ये सर्व गोष्टी येणं अपेक्षित आहे. त्याचे नाव येणं अपेक्षित आहे, कारण तो पुरावा नष्ट करत आहे. हे खंडणी मागणारे हे सर्व चार्जशिटमध्ये आले पाहिजे. या सर्वांची ईडीची चौकशी करावी अशी आपली मागणी असल्याचे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्या मुलीची दहावीची परीक्षा झाली नाही म्हणून ते सागर बंगल्यावरुन वर्षावर गेलेले नाहीत. परंतू देवेंद्र फडणवीस यांना मराठा समाजाने गादीवर बसविले आहे. आमच्या हकाचे आरक्षण तुम्हा आम्हाला देत नाहीत. महाराष्ट्राच्या मुलीत त्यांना त्यांची मुलगी दिसत नाही का असा सवाल मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. कराडचे व्हिडीओ पाहातो म्हणून अशोक मोहिते यांच्यावर कोयत्याने वार झाले आहेत. त्याबद्दल विचारता जरांगे यांनी हे थांबणार नाही.याची सर्व जबाबदारी मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्याची आहे. धनंजय मुंडे यांची टोळी ही कलंक आहे. मुंडे जेलमधील आरोपींशी संपर्कात आहेत का असा संशय आहे. एवढी संपत्ती सापडलीय तर यांच्या ईडीची कारवाई व्हायला हवी अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे.

जो पकडला गेला त्याच्यावर ३०२ दाखल आहे का? नेमकी काय अडचण आहे. त्याला नुसत्या डोक्यात मुंग्या आल्यात तर दवाखान्यात ठेवले, मग महादेव मुंडेला का नाही ठेवले ? तो मृत्युशी झुंज देत होता असा सवाल देखील जरांगे पाटील यांनी केला आहे. त्या जातीची एक पत होती मात्र आता मान खाली घालून जगावं लागत आहे. चाटेने मोबाईल धनंजय मुंडे कडे ठेवला आहे, तो नाशिकला ठेवला, फोन लावला तो हा बडा नेता कोण? ज्या गाडीने गेला ती गाडी पोलीस स्टेशनला, मग त्यांना आरोपी का नाही केलं ? धनंजय मुंडे सांगत आहे की लोक त्याच्या सोबतचे आहेत. ती जप्त प्रॉपर्टी त्याची नाही त्यामुळे ईडी चौकशी झाली पाहिजे असेही जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.



## २३ मुस्लिम जोडपी विवाहबध्द



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : तन्जीम रहेनूमा-ए-कारवाँ अल्पसंख्यक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, किनवटच्या वतीने दि.०७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता एन. के. गार्डन येथे १३ वा मस्लिम समाज विवाह मेळावा संपन्न झाला. या विवाह मेळाव्यात एकूण २३ मुस्लिम जोडपी विवाहबध्द झाली.या मेळाव्याप्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, मौलाना, धर्म गुरू यांचेसह लोकप्रतिनिधी विविध पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकत्यांनी उपस्थित राहून जोडप्यांना व मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.

### लग्नाचा बस्ता बांधायला जाणा-या बोलोरो गाडीला टेम्पोची समोरुन धडक

## सांगवी (सा)च्या पुलावरील आपघातात वरबाप आणि नातेवाईक एक महिला असे दोनजण जागीच ठार

केज/प्रतिनिधी:- नगरला मुलीच्या लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी जाणा-या वरबापावर आणि नातेवाईक महीलेवर काळाचा घाला शुक्रवारी सकाळी केज-बीड रोडवर केज तालुक्यातील सांगवी सारणी पुलावर झालेल्या आपघातात वरबाप रामेश्वर डोईफोडे १. कासारी व कोरेगाव येथील नातेवाईक महिला उर्मिला घुले याचा मृत्यु झाला आहे. तर जिपमधील काही महीला व पुरुष जखमी झाले असुन त्यांच्यावर अंबाजोगाई येथे उपचार सुरु आहेत. केज तालुक्यातील कासारी येथील रामेश्वर शाहूराव डोईफोडे यांच्या



मुलीचा २३ फेब्रुवारी रोजी केज जवळील एका मंगल कार्यालयात विवाह होणार होता. त्या लग्नाचा बस्ता बांधण्यासाठी शुक्रवारी सकाळी कासारी येथून अहमदनगरला एका बोलोरो गाडीनेसर्व नातेवाई जात असताना केज पासुन सतरा की. मी. अंतरावर असलेल्या सांगवी सारणी पुलावर नेकनूर कडून येणा-या कॅन्टर टेम्पो क्र. (टी एस ०१/युसी ५५०२) ने समोरुन येणा-या बोलेरो गाडी क्र (एम एच-१६/२ टी-००६२) या गाडीला जोरदार धडक दिल्याने जिप मधील नातेवाई महिला उर्मिला उर्फ उमा श्रीराम घुले (वय ४५ वर्ष) (रा. कोरेगाव ह. मु. शिक्षक कॉलनी केज) या महिलेचा जागीच मृत्यू तर वरबाप रामेश्वर शाहूराब डोईफोडे वय ५२ वर्षे रा. कासारी ता.केज यांचा दवाखान्यात घेऊन जाताना मृत्यु झाला आहे. जिप मधील जखमी रुग्णावर अंबाजोगाई येथील सरकारी दवाखाण्यात उपचार सुरु आहेत. केज तालुक्यातील कासारी व कोरेगाव गावावर शोककळा पसरली आहे.

## साहित्यसंपदा प्रकाशनच्या ८७ व्या मिलाफ या चित्रकाव्य संग्रहाचे प्रकाशन



गोष्ट तुझी माझीङ्ग जगलेल्या कविता, शब्द माझे तुझ्याचसाठी मनमानसी, मयूरस्पर्श या व अशा अनेक पुस्तकांच्या यशा नंतर साहित्यसंपदातर्फे चंद्रकांत मोहिते व प्रांजली मोहिते यांच्या ममिलाफफया चित्रकाव्यसंग्रहाचे प्रकाशन अध्यक्ष राजन लाखे महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड यांच्या शुभहस्ते पिंपरी-चिंचवड पुणे येथे पार पडले. साहित्यसंपदा प्रकाशित ८७ व्या पुस्तक प्रकाशनाचा हा सोहळा होता. या काव्यसंग्रहाला राजन लाखे अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी- चिंचवड यांची प्रस्तावना आणि मार्गदर्शन लाभले आहे.या कार्यक्रमास वैभव धनावडे, प्रकाशक साहित्य संपदा, प्रो. आशिष पाटील संस्थापक माइंड शिफ्ट मेंटॉरिंग,कवी लेखक लालसिंग वैराट यांची विशेष उपस्थिती होती.श्रीमती कांचन मोहिते व श्रीमती रत्ना जगदाळे यांची उपस्थिती होतीकार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमात चंद्रकांत मोहिते व प्रांजली मोहिते यांच्या ममिलाफफ या चित्रकाव्यसंग्रहातील काही निवडक कवितांचे वाचन प्रतिमा देशमुख, कवयित्री करूणा शिंदे, कवयित्री अर्चना गोरे, शर्मिला गोवंडे, रिया पाटील, कवयित्री अमृता देखणे, करूणा शिंदे यांनी केले. हा चित्रकाव्यसंग्रह चंद्रकांत मोहिते यांच्या सुंदर चित्रांवर त्यांच्या पत्नी प्रांजली मोहिते यांनी रचलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या कवितांच्या रंगीबेरंगी सुबक चित्र काव्यमय मांडणी मुळे आकर्षक ठरला.

# प्रा. सत्येंद्र राऊत यांना राष्ट्रीय पुरस्कार

प्रतिनिधि..... कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समिती, महाराष्ट्र राज्य आयोजित माँ तुझे सलाम कर्तव्य संमेलनात समाज, संस्कृतीचे संरक्षण व लोकशाही विचारांना एकत्र आणण्यासाठी आणि जगण्याचे चांगले ध्येय बनवणा-या अशा ऐतिहासिक गुणवत्तेच्या सर्वश्रेष्ठ सन्मान सोहळ्यात अणदूर येथील जवाहर महाविद्यालयातील संस्कृत विभाग प्रमुख प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री मा. नयना आपटे, राष्ट्रीय सैनिक संस्थेचे संचालक मा. लायन डॉ. प्रशांत सर, महाराष्ट्र शासन युवक पुरस्कार विजेते तसेच कला, पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव समितीचे संस्थापक प्रा. डॉ. बी. एन. खरात यांच्या शुभ हस्ते पालघर येथे साहित्य निर्माता राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत यांची संपादित पाच पुस्तके डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील संस्कृतच्या





अभ्यासक्रमात समाविष्ट असून चार प्रातिनिधीक काव्यसंग्रह प्रकाशित झालेली आहेत यापैकी प्रेम काव्यसंग्रहाची ओ एम जी या जागतिक रेकॉर्ड बुकमध्ये नोंद झालेली आहे. अशा प्रकारच्या विविध साहित्यनिर्मितीमुळे साहित्य निर्माता राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे सचिव मा. रामचंद्रदादा आलुरे, मार्गदर्शक मा. विक्रम आलुरे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी व उपप्राचार्य डॉ. मल्लीनाथ लंगडे आणि विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.डॉ. अंकुश कदम सर आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांनी प्रा. राऊत सरांचे अभिनंदन केले.

# माझ्या मुलाचा माझ्याविरोधात वापर केलात तर मी सर्व काढणार, करुणा शर्मा

गेल्या काही दिवसापासून करुणा शर्मा या धनंजय मुंडेंच्या विरोधात कायदेशीर लढाई लढत आहेत. त्यातच आज वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने धनंजय मुंडे यांनी करुणा शर्मा यांना दर महिन्याला दोन लाख रुपये मेंटेन्स रक्कम द्यावी, असे आदेश दिले आहेत. त्यावर आता धनंजय मुंडे यांचा मुलगा शिशीव मुंडेने त्याची आई करुणा शर्मावर गंभीर आरोप केले आहेत.माझी आई माझ्यासोबत, माझ्या बहिणींसोबत आणि माझ्या वडिलांसोबत घरगुती हिंसाचार करायची. माझ्या वडिलांनी तिला सोडल्यानंतर तिने आम्हाला घर सोडायला सांगितलं. कारण तिच्यासाठी आमचं अस्तित्व नव्हतं, असा धक्कादायक खुलासा शिशीव मुंडेने केले आहे. आता यावर करुणा शर्मा यांनी स्पष्टीकरण दिले आहे.करुणा शर्मा यांनी नुकतंच प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना मुलगा शिशीव मुंडेच्या पोस्टबद्दल प्रश्न विचारण्यात आले. त्यावर त्यांनी सविस्तरपणे भाष्य केले.जर माझ्या मुलाचा आणि मुलीचा माझ्याविरोधात वापर केला, तर मी सर्व काढणारङ्क, असा धमकीवजा इशारा करुणा शर्मा यांनी दिला.माझ्या मुलावर किती प्रेशर दिला जात आहे माझ्या मुलाला कुठे ना कुठे तरी त्रास होत आहे. आज जे कोणी प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी होते त्यांनी पाहिलं आहे की माझ्या मुलावर किती प्रेशर दिला





जात आहे. त्याला किती फोन येते होते. ते फोन ऐकल्यानतंर तो किती तणावाखाली होता. पण ती गोष्ट माझ्या नव-याला कळत नाही. माझ्या आणि माझ्या नव-यामध्ये जे वाद आहेत, त्याचा त्रास त्यांनाही होत आहे. त्यांनाही ती लोक त्रास देतात, असे करुणा शर्मा म्हणाल्या. माझ्याविरोधात तो कधीही जाणार नाही माझा मुलगा, मुलगी, नवरा हे सर्वजण कोर्टातील केस परत घ्या असे मला वारंवार सांगत आहे. कोर्ट केस करु नका. हा वाद संपवा. मी पण हा वाद संपवण्यासाठी तयार आहे. पण आज मुलाबाळांना त्रास होत आहे. आज अचानक कोर्टाकडून निकाल लागला. मीडियाचे प्रतिनिधी घरी आले. मी धनंजय मुंडेंबद्दल काहीही बोलले नाही. तरीही ही लोक माझ्या मुलाला त्रास देत आहेत. त्यांना हे बोला, ते बोला, असा सतत दबाव येत आहे. माझा मुलगा असा नाही. तो कधीच अशी पोस्ट करणार नाही. माझ्याविरोधात तो कधीही जाणार नाही. पण त्यांनाही प्रेशर दिला जात आहे, असे करुणा शर्मांनी सांगितले.तीन वर्षांपासून ते खूप सहन करतात धनंजय मुंडेंनी फोन केला आणि मीडियाला बाहेर काढा असे सांगितले. काय करणार, आम्ही एकटे आहोत, मुलगा मुलगी खूप लहान आहेत. तीन वर्षांपासून ते खूप सहन करत आहेत. आईला दोन वेळा जेलमधलं टाकलं, मारहाण करणं, ते खूप लहान आहेत. माझ्याकडे पुरावे आहेत. सोसायटीचा मेंटेन्स रखडला. पालिकेची नोटीस आहे. काल मी मुलाला ही पाठवली आहे. माझ्या मुलाचा आणि मुलीचा माझ्याविरोधात वापर केला, तर मी सर्व काढणार. कोणाकडे २५ हजार कोटींची प्रॉपर्टी आहे दलाली करुन, असेही करुणा शर्मांनी म्हटले.

## संपादकीय

# रेल्वेच्या प्रकल्पांना वैष्णवांचा बुस्टर डोस

मुंबईकरांची लाईफलाईन असलेली मुंबई लोकल आता सुपरफास्ट आणि आलिशान होणार आहे. या लोकल सेवेत लवकरच नवे आणि प्रवाशांच्या पसंतीला येतील असे बदल करण्याची भूमिका रेल्वे मंत्रालयाने घेतली आहे. त्यातूनच खचाखच भरलेल्या डब्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी पुरेसे ऑक्सिजन मिळू शकेल अशा पद्धतीची रचना असणारे नवे डबे सेवेत आणले जातील. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास मोकळा होऊ शकेल. या बदलासोबतच मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावर नवे टर्मिनल उभारण्यासह उपनगरीय रेल्वे सेवेत नवे बदल होणार आहेत, असे केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. वैष्णव यांनी दिलेल्या माहितीमुळे दररोज लोकलने प्रवास करणारे सुमारे ७५ लाख प्रवासी निश्चितच सुखावतील. यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी २३ हजार ७७८ कोटींची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांमध्ये एक लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे. गेल्या साडेदहा वर्षांमध्ये मोदी सरकारच्या कार्यकाळात दोन हजार १०५ कि.मी. लांबीचे नवे रेल्वे मार्ग टाकण्यात आले. त्यातील तीन हजार ५८६ कि.मी.सह शंभर टक्के विद्युतीकरण झाले आहे. सध्या महाराष्ट्रात एक लाख ५८ हजार ८६६ कोटींच्या चार नव्या प्रकल्पांसह सहा हजार ९८५ किमीच्या एकूण ४७ प्रकल्पांची कामे सुरू असल्याची माहिती रेल्वेमंत्री वैष्णव यांनी सोमवारी दिल्लीमध्ये पत्रकार परिषदेत दिली आहे. मुंबई लोकलच्या सुधारणासाठी नवीन कोणत्या गोष्टी समोर आल्या, तर मुंबई उपनगरीय रेल्वेसाठी १६ हजार ४०० कोटी खर्चून ३०१ किलोमीटर लांबीच्या रेल्वे प्रकल्पांची कामे सुरू आहेत. प्रवाशांचा प्रवास वेळ वाचवण्यासाठी लोकलचा वेग वाढविण्याचा निर्णय मध्य रेल्वेने गेल्या वर्षी घेतला होता. त्यानुसार आता लोकलचा वेग वाढविण्याचे काम करण्यात येत आहे. दोन लोकलमधील वेळ कमी करण्याचा विचार असल्याचे अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दोन लोकलमधील वेळ १८० सेकंदाचा आहे, त्याला आधी १५० सेकंद करण्यात येईल. त्यानंतर हा वेळ १२० सेकंदांवर आणला जाणार आहे. त्याशिवाय गर्दी कमी करण्यासाठी लोकल वाढविण्यात येणार आहेत, मुंबईत सध्या दररोज ३ हजार गाड्या धावत असून त्यात आणखी ३०० गाड्यांची भर घालण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे. लोकलच्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तिन्ही मार्गांवर लोकलला कवच प्रणालीबरोबरच कम्बाइन कम्युनिकेशन बेस्ड ट्रेन कंट्रोल सीबीटीसी यंत्रणा जोडली जाणार आहे. मुंबईबरोबर महाराष्ट्रात रेल्वेचे जाळे वाढवण्याचा भारतीय रेल्वेचा प्रयत्न दिसून आला आहे. पाच हजार ५८७ कोटी रुपये खर्चून राज्यातील १३२ अमृत स्थानके विकसित केली जाणार आहेत. महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यांमध्ये ११ वंदे भारत धावत आहेत. नागपूर रेल्वे स्थानकाच्या ५८९ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या पूर्व भागाच्या इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे. त्याचप्रमाणे ३६० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या नागपुरातील अजनी रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागाचे, एक हजार ८१३ कोटी खर्चाच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचे, ३५९ कोटी खर्चाच्या छत्रपती संभाजीनगर स्थानकाच्या दक्षिण भागाच्या इमारतीचे आणि १८२ कोटी खर्चाच्या जालना स्थानकाच्या इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे. यापूर्वी २००९-१४ या काळात महाराष्ट्राला वर्षाला सरासरी १ हजार १८१ कोटी रुपये रेल्वे बजेटमध्ये मिळायचे. यंदा एकाच वर्षातील तरतूद ही तब्बल २० पटींनी अधिक आहे. २०१४ ते २०२५ या दरम्यान राज्यात दरवर्षी सरासरी १९१ किलोमीटर्सचे नवे रेल्वे मार्ग विकसित केले गेले आहेत. हे प्रमाण यापूर्वीच केवळ दरवर्षी सरासरी ५८ किलोमीटर इतके होते. २००९-१४ या कालावधीत एकाही मार्गाचे विद्युतीकरण झाले नव्हते. त्यानंतर २०१४ ते २०२५ या काळात दरवर्षी सरासरी ३२६ किलोमीटर्स मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले. यामुळे महाराष्ट्रातील ३ हजार ५८६ म्हणजेच पूर्णपणे विद्युतीकरण झाले आहे.याच कालावधीत महाराष्ट्रात २ हजार १०५ किलो मीटर्सचे नवे रेल्वे मार्ग बांधण्यात आले. तुलनाच करायची झाल्यास ही लांबी मलेशियातील आता अस्तित्वात असलेल्या संपूर्ण रेल्वे मार्गाच्या लांबी इतकी होते.

# शौर्यगाथा मराठवाडा मुक्तिसंग्रामाची हे पुस्तक नव्या पिढीला प्रेरणा देणारे

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : निर्मल प्रकाशन नांदेड यांनी प्रकाशित केलेला ग्रंथ शौर्यगाथा लेखक प्रा. संतोष देवराये यांचा नुकताच वाचून काढला. ग्रंथाच्या सुरुवातीला अर्पण पत्रिका दिली असून लेखकांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या अजरामर कार्याला भावस्थ होऊन ही अर्पण पत्रिका समर्पित केली आहे. त्यामुळे लेखक राष्ट्र कार्याप्रती किती भाऊक झाला आहे, नम्र झाला आहे, याची खात्री पटते. ज्यांच्या रक्तात निष्ठा, राष्ट्र प्रेम, समर्पण आणि सेवाभाव रुजला आहे, असेच लोक अनन्यसाधारण कामगिरी करणारे असतात. लगेच कल्हाळी येथील हुतात्मा स्मारकाचे छायाचित्रासह ३५ हुतात्म्यांच्या नावाची यादी देऊन तमाम कल्हाळी वाशियांचा गुणगौरव केला आहे. पुस्तकाच्या म लपृष्ठावरील हुतात्मा स्मारक आणि कल्हाळीचे हुतात्मा स्मारक हेच या निजाम राजवटीतील युध्दाची धग साक्षीभूत करणारे आहे. कारण मलपृष्ठावरील हुतात्मा स्मारक हे शासनाने उभे केले असून कल्हाळी येथील हुतात्मा स्मारक हे एका महान समाजकार्य करणा-या डॉ. महेश तळेगावकर यांनी उभे केले आहे. त्यामुळे या हुतात्मा स्मारकाला विशेष मोल आहे. कारण जनतेच्या मनातील चित्रण हे कधीही सर्वश्रेष्ठ ठरते आणि हाच तो या दोन्ही हुतात्मा स्मारकातील फरक आहे. या ऐतिहासिक संदर्भ ग्रंथाला मा. खा. अशोकरावजी चव्हाण साहेब, मा. ना. डी. पी. सावंत साहेब आणि नांदेडचे पोलिस उप महानिरीक्षक शहाजी उमाप साहेब यांचा शुभेच्छा संदेश प्राप्त झाला आहे. त्यामुळे या ऐतिहासिक ग्रंथाची उंची निश्चितच वाढली आहे. एवढेच नव्हे; तर महाराष्ट्र राज्याचे भाग्यविधाते आदरणीय कै. डॉ. शंकररावजी चव्हाण साहेब यांची आवर्जून आठवण झाल्याशिवाय रहात नाही. कारण कल्हाळी लढ्याला शासन दरबारी न्याय देणारे आदरणीय डॉ. शंकररावजी चव्हाण साहेब, खा. शरदचंद्रजी पवार साहेब आणि कै. मा. खा. केशवरावजी धोंडगे साहेब यांचे योगदान कधीच विसरता येणार नाही.हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची ही शौर्यगाथा भारताचा दुसरा स्वातंत्र्य लढाङ्ग असा उल्लेख या ग्रंथात केला गेला असल्याने भारतीय स्वातंत्र्य संग्राम किती क्रांतीकारी टप्प्यातून मार्गक्रमण करत पुढे आला आहे, याची साक्ष पटते. त्यामुळे या विधानाला विशेष महत्त्व आहे. असे विधान आज पर्यंतच्या प्रकाशित झालेल्या एकाही संदर्भ ग्रंथात माझ्यातरी वाचण्यात आले नाही. वेरूळ आणि अजिंठ्याच्या लेणी संदर्भात जागोजागी नोंदी आढळून येतात पण... पितळखोरा लेणी, घटोत्कच लेणीचा उल्लेख मी नव्याने या ग्रंथात वाचतो आहे. त्यामुळे हा ग्रंथ महाभारतातील घटोत्कच या व्यक्तीरेखेची आठवण करून देतो. म्हणून या ग्रंथाला अनन्य साधारण महत्व आहे. याचाच अर्थ मराठवाड्याच्या भूमीला श्री सामर्थ्याचा स्पर्श झाला आहे. हे वाचून कुठल्याही वाचकाला आनंद झाल्या शिवाय रहाणार नाही. जंजाळा अर्थात वैशागड, भडकल दरवाजा, दिल्ली दरवाजा, मक्का दरवाजा हा संदर्भ सुध्दा या ग्रंथात नव्याने मुखर झाला असल्याने मानवी जीवन जानिवेतील ज्ञानकोषात मौलिक भर घालणारा ठरतो आहे. एवढेच नव्हे; तर छत्रपती संभाजी नगर येथील पाणचक्की ही प्रसिद्ध असली तरी ती मलिक अंबरच्या काळात निर्माण झाली आहे, अशी माहिती वाचकांना नव्याने होते आहे. ही बाब विशेष आहे. ही माहिती वाचकांचे सामान्यज्ञान वाढवणारी ठरते. असे असले तरी मराठवाड्यातील जनतेला विकासाची आस होती परंतु आजतागायत हे साध्य झाल्याचे दिसत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र शासन मराठवाड्याच्या विकासासाठी झुकते माप देईल, असे इंथल्या लोकांना वाटले होते. विविध क्षेत्रात विकासाचा जो अनुशेष आहे, तो भरून काढण्याचे अभिवचन महाराष्ट्र शासनाने दिले होते. मात्र अद्याप ते पुर्ण झाले नाही. एवढेच नव्हे; तर व्यापा-्यांच्या बटीक झालेल्या मार्केट कमिट्या असा सडेतोड उल्लेख हा धाडसी स्वरुपाचा तरी आहेच आणि क्रांतिकारी स्वरुपाचा निर्भय आहे. कारण हे कोणीतरी लिहायला हवे होते पण ते लिहिले गेले नव्हते. हे धाडस इतिहास संशोधक प्रा. संतोष देवराये यांनी निश्चितच केले आहे. त्यामुळे ते अभिनंदनास पात्र झाले आहेत. मोठ्या अपेक्षेने महाराष्ट्रात विनाअट सहभागी झालेल्या मराठवाड्याच्या वाट्याला येवढी उपेक्षा यावी. यापेक्षा दुसरे कोणते दुदैव आहे? कारण मराठवाड्यात मागील दशकात दहा हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. आज घडीला २० ते ४० वयोगटातील तरुण कर्ती माणसं आत्महत्या करीत आहेत. मराठवाड्यात आज घडीला सुमारे दहा लाख तरुण बेरोजगार आहेत. अशी आकडेवारी सुध्दा दिली आहे. संवैधानिक तरतुदींमुळे म राठवाड्याला माजी प्रधानमंत्री मा. ना. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात वैधानिक विकास मंडळ मिळाले, पण आज त्याचा फक्त सांगाडा शिल्लक आहे. अशी ही वेदना वस्तूस्थितीला धरुन असल्याने या ठिकाणी हाडाचा कार्यकर्ता पराभूताच्या प्रदेशात आणि महाप्रदेशात व्यथा वेदनेची तुतारी फुंकत गलबलून जातो. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वास्तव इतिहास कसा लिहावा याचे भान असलेला लेखक म्हणतो, ङ्गअनेकांच्या सेवा, समर्पण, त्याग आणि बलिदानातून ही भूमी स्वतंत्र झाली. विविध जाती धर्मातील, विविध वयोगटातील बहादुर तरुणांनी आणि अबालवृध्दांनी रझाकारांशी दिलेली कडवी झुंज मराठवाड्याच्या मुक्ती लढ्यातील एक सुवर्णपान आहे. मुक्तीसंग्रामाची ही शौर्यगाथा भारताचा दुसरा लढा म्हणून अजरामर झाली आहे.ङ्ग हे विधान १००% सत्य असून या विधानाचा वास्तव इतिहास समजून घ्यायचा असेल तर कल्हाळी लढा वाचताना निश्चितच अनुभूती येईल. कारण कल्हाळी लढ्यात सोळा वर्षांच्या तरुणा पासून ते ८० वर्षाच्या म्हाता-या पर्यंत दिलेली झुंज मनोवेधक तरी आहेच पण त्या सोबत रणझुंजार क्रांतीसंगर योध्याची साक्ष पटते. म्हणून या पुस्तकात लेखक म्हणतो, ङ्गजुजबी बाबींवर चित्रपट काढून करोडोचा गल्ला जमा करणा-या चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, नट - नटी यांचे कल्हाळी येथील स्वातंत्र्य लढ्याकडे लक्ष जाऊ नये हे दुर्दैव म्हणावे लागेल.ङ्ग पाटनूर येथील जंगल सत्याग्रह इतिहास रुपाने मांडत असताना लेखक म्हणतो, ङ्गया जंगल सत्याग्रहामध्ये सारे जंगल नष्ट करणे हा सत्याग्रहीचा मुळ उद्देश नव्हताच तर एखादे झाड तोडून कायदेभंग चळवळ करणे हा हेतू होता. या जंगल सत्याग्रहामध्ये सहभागी झालेले लोक वृक्षप्रेमी, पर्यावरण प्रेमी आणि वन्य जीवावर जीवापाड प्रेम करणारे होते.ङ्ग असे छातीठोक विधान केले असल्याने मराठवाडा मातीचे संस्कार आणि मराठवाड्याची संस्कृती ठळकपणे पुढे आली आहे. कारण मराठवाड्यातील स्वातंत्र्य सैनिक काही लेचेपेचे नव्हते या बाबीची साक्ष या पुस्तकात मिळते. पृष्ठ क्रमांक ३५- सेनानीकडे ऑटोमॅटिक रायफली होत्या. ट्रिगल दाबला की एका वेळी २८ फायर होत होते. कारण निजामाच्या इराणी फौजा कार्यरत होत्या. या रोहिल्याचा सर्वसामान्य जनतेवर अन्याय अत्याचार होत होता. भोकर तालुक्यातील किनी गावाचा इतिहास मांडत असताना सोन्याची किनी या गावावर हल्ला करून, ३०० रझाकाराने स्वातंत्र्य सेनानीचा शिरच्छेद करून ८० बैलगाड्या भरून सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तू लुटून नेल्या. असे मांडले आहे. याचा अर्थ खरोखर आम च्या देशातून सोन्याचा धूर निघत होता याची जाणीव होते. या पुस्तकात लेखक असेही म्हणतो की,ङ्गइतिहास विसरणारे इतिहास कधीच घडवू शकत नाहीत. शिक्षण हेच विकासाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. प्राथमिक शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे हे तत्व जगातील सगळ्याच राष्ट्रांनी स्विकारले आहे. बडोदा संस्थानचे राजे सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूर संस्थानाचे राजे छत्रपती शाहु महाराज यांच्यावर भाष्य करताना लेखक म्हणतो, शिक्षणा शिवाय विकास शक्य नाही ही धारणा या दोन्ही राजाच्या मनात होती पण निजामाच्या नाही.अखेर निजामाच्या सत्तेची मस्ती उतरली आणि भागानगरी अर्थात हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले. रझाकाराचा म्होरक्या कासिम रजवी पाकिस्तानला पळून गेला. भारतीय लष्कराने निजामी सत्ता नेस्तनाबूत केली पण या कार्यवाहिला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीङ्गपोलीस ॲक्शन असे नाही दिले. ही बाब सुध्दा अनेकांना माहीत नव्हती. इतिहास संशोधक प्रा. संतोष देवराये यांच्या पुस्तकाचा उपयोग संदर्भ ग्रंथ म्हणून निश्चित होईल. कारण हे एक ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

नरेंद्र नाईक, नांदेड
पशुधन विकास अधिकारी गट -ब (विस्तार)
पंचायत समिती कळमनुरी

# शेतक-यांकडील पूर्ण सोयाबीन संपेपर्यंत शासनाने खरेदी केंद्र सुरू ठेवावेत - संभाजी ब्रिगेडची मागणी

अंबाजोगाई (वार्ताहर)शेतक-यांकडील पूर्ण सोयाबीन संपेपर्यंत शासनाने खरेदी केंद्र सुरू ठेवावेत अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने बुधवारी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.याबाबत संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांच्यासह जिल्हा सचिव नारायणराव मुळे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या अंबाजोगाई तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष केशव टेहरे, तालुकाध्यक्ष पृथ्वीराज सोनवणे, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, जनता दल (सेक्युलर) पक्षाचे जिल्हाध्यक्ष वाजेद खतीब, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अंकुशराव ढोबळे, ॲड.व्हि.व्हि.उगले, डिगांबर सोळंके, ॲड.एस.पी.सोनवणे यांनी अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आणि तहसीलदार यांना बुधवार,



दिनांक ५ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शेतक-यांच्या घरी मागील दोन-तीन वर्षांपासून सोयाबीन पडून आहे. कारण तीन-चार वर्षांपासून सोयाबीनचा भाव वाढत नाही. म्हणून शेतकरी यांनी पोटाला चिमटा घेऊन सोयाबीन घरात ठेवली आहेत. म्हणून शासनाने खरेदी केंद्राची संख्या वाढवून शेतक-यांचे सोयाबीन खरेदी करावी. जे खरेदी केंद्र चालू आहेत, त्या खरेदी केंद्रांची कपॅसिटी वाढवून सोयाबीन खरेदी करावीत, जे खरेदी केंद्र चालू आहेत त्या केंद्रावर सोयाबीन चाळणा-या मशीनची संख्या वाढवावी. २०२४ व २०२५ चा केंद्र शासनाचा हमीभाव रूपये ४८९२/- आहे. अंबाजोगाई बाजार समितीने हमीभावाचे परिपत्रक काढले आहे. माननीय उपजिल्हाधिकारी यांनी बाजार समितीला अंमलबजावणी करण्यास भाग पाडावे. जे व्यापारी सोयाबीन हमीभावाने खरेदी करणार नाहीत, त्या व्यापा-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे लायसन्स रद्द करावे. तसेच उपजिल्हाधिकारी यांनी शेतक-यांच्या पुढील मागण्या मान्य कराव्यात. १) केंद्र शासनाने शेतक-यांच्या घरातील सोयाबीन संपेपर्यंत खरेदी केंद्र चालू ठेवावे. २) अंबाजोगाई बाजार समितीने व उपजिल्हाधिकारी यांनी केंद्र सरकारच्या हमीभावाची अंमलबजावणी करावी. ३) २०२४ व २०२५ चा केंद्र सरकारचा सोयाबीनचा भाव ४८९२/- इतका आहे. त्याची अंबाजोगाई बाजार समितीने अंमलबजावणी करावी., ४) अंबाजोगाई शहरातील लातूर एडीएमचे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे. हमीभावाने सोयाबीन खरेदी केली नाही तर संभाजी ब्रिगेड (ता.अंबाजोगाई) व अंबाजोगाई तालुक्यातील शेतकरी रस्ता रोको आंदोलन करणार आहेत. आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी शासन व प्रशासन यांची राहील. याची आपण नोंद घ्यावी असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# आत्महत्या एक चिंतन

स्वतःच स्वतःचे आयुष्य संपवण्याचे कृत्य म्हणजे आत्महत्या. ज्यावेळी एखाद्या व्यक्तीला आपले जीवन निरर्थक किंवा निरस वाटते तसेच जीवनामध्ये सतत येणारे अपयश, कर्जबाजारीपणा, आर्थिक विवंचना, नाते संबंधातील गुंतागुंत, अनैतिक संबंध, फसवणूक यासारखे प्रकार जीवनात होतात तेव्हा त्या व्यक्तीच्या मनामध्ये आत्महत्येचा विचार येतो. काही वेळेस मानसिक आजारांमुळेही आत्महत्या होत असतात. खरंतर आत्महत्येसारखा मार्ग पत्करण्याची इच्छा तशी कोणाचीच नसते. एखाद्या समस्येच्या चक्रव्युहात माणूस अडकला जरी असला तरी त्यातून बाहेर पडण्याची धडपड तो नक्कीच करीत असतो. असे सारे प्रयत्न करुन पाहिल्यानंतरही मार्ग सापडत नसेल, सर्वत्र अंधारच अंधार जावत सर्वकाही संपल्याची भावना जेव्हा पक्की होते तेव्ही आत्महत्येचे पाऊल उचलले जाते. आकडेवारीनुसार जगभरात दरवर्षी सुमारे दहा लाख लोक आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. अलिकडे आत्महत्या करणारांमध्ये तरुण मुलांचा समावेश अधिक असल्याचे जाणवते. आत्महत्या ही गंभीर बाब असून सर्वत्र चिंतनाचा विषय तो ठरत आहे.

हिंदुत्वासाठी उभा महाराष्ट्र पिंजून काढणारे, संत तुकाराम महाराज यांचे ११ वे वंशज शिव व्याख्याते, ह.भ.प. शिरीष महाराज यांनी आपल्या कीर्तन प्रवचन व प्रबोधनातून जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला, जगण्याची दिशा अनेकांना दाखवली अशा थोर विचारवंतांनी आर्थिक विवंचनेतून देहू येथील आपल्या राहत्या घरामध्ये ४ फेब्रुवारी रोजी आत्महत्या केल्याची घटना घडली.

भाईदर येथे २८ जुलै रोजी पिता-पुत्र यांनी संगनमताने रेल्वे ट्रँकवर झोपून आत्महत्या केल्याची दुर्घना घडली. या घटनेमुळे मुंबईसह अरव्वा महाराष्ट्र हादरला आहे. आत्महत्या अलिकडे तसा हा नवीन विषय नाही. आत्महत्या कोणी केली? का केली? याचे गांभिर्य सुध्दा राहिले नाही. विशेष म्हणजे ज्या व्यक्तीने आत्महत्या केली तिलाच प्रथमत आपण दोषी ठरवत असतो. त्याचबरोबर आत्महत्या करणे चुकीचे आहे, आत्महत्या केल्याने प्रश्न सुटत नसतात अशा प्रकारचे तत्वज्ञान लोक सांगत असतात. जो तो शहाणपणाचे धडे गिरवत बसतो आणि आत्महत्येचे पाऊल का उचलायला नको होते? खरचं आत्महत्या करणे गरजेचे होते का? याविषयीचे तर्क-वितर्क मांडत बसतो. अर्थात प्रत्येक आत्महत्या करणारी व्यक्ती ही अशिक्षित, अज्ञानी असतेच असेही नाही. आत्महत्या करण्यासारखे टोकाचे पाऊल कोणी उगाच उचलत नसतो. प्रत्येका आपला जीव महत्वाचा असतो. वेगवेगळ्या संकट प्रसंगातून जेव्हा आपण मार्गक्रमण करीत असतो, त्यातून बाहेर पडण्यासाठी जो तो आपल्या पध्दतीने प्रयत्न करीतच असतो. आपल्या पातळीवर बरेच प्रयत्न करीत त्यातून मार्ग शोधत असतो, वेळप्रसंगी मनाविरुध्द अंधश्रध्देचा मार्गही स्विकारतो परंतु आजूबाजूचे सर्व दरवाजे बंद होतात, ती व्यक्ती अक्षरशः हतबल होते....सारं-सारं संपल्यासारखं वाटतं तेव्हा वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्येशिवाय पर्याय शिल्लक राहत नसतो. कोणीही सहजच आत्महत्या करीत नाही.

प्रत्येक व्यक्ती आपल्या सुखासाठी दिवसरात्र धावपळ करीत असतो. इतरांना देखील सुख देण्यासाठी प्रयत्न करीत असतो. सर्वच जन्मतः सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येत नसतात. बहुतांशी लोकांना बालवयापासून दुःख दारिद्र्याला सामोरे जावे लागते. आई-वडिलांची हलाखीची परिस्थिती पाहून मुले देखील सावध होतात व आपल्यालाही कष्ट करावे लागणार ही मानसिक तयारी ठेवून ते आपली वाटचाल त्यादृष्टीने करीत असतात. जीवन म्हटले म्हणजे संकटे यातना कष्ट अनब धावपळ आलीच. सर्वांनाच सर्वच सहजगत्या मिळत नसते तर ते परिश्रमातून मिळवावे लागते. यशस्वीतेचे शिखर प्राप्त केलेल्या सर्वांची आजची समोरील बाजू ही बाह्यरूपातून दिसत असते मात्र त्यामागील खडतर प्रवासाची पार्श्वभूमी आणि भूतकाळ सहजासहजी कोणाच्या नजरेस येत नसतो. फार थोड्यांना ती बाजू माहीत असते. जीवनाचा हा खडतळ प्रवास ज्यांना नकोसा वाटतो अशांची प्रगती तिथेच थांबत असते. काहींची बौध्दिक पातळी कमजोर असल्यामुळे ते वेगळ्या वाटेवर जातात तर काही कमी कष्टात खूपकाही अधिक मिळवण्याच्या नादात ब-याच वेळा चुकीचा मार्ग देखील निवडतात. यामुळे स्वतःबरोबर ते परिवारासाठी त्रासदायक ठरतात. विविध व्यसनांच्या आहारी जाऊन आपल्या जीवनाचे महत्वच विसरुन आपणच योग्य असल्याचे त्यांना वाटत असते.

वसई पूर्व येथील रश्मी दिव्य हौउसिंग सोसायटीत राहणारे हरीश मेहता (६० ) आणि त्यांचा मुलगा जय मेहता ( ३० ) व सुन अंजली मेहता हे सोबत वास्तव्यास होते. हरीश मेहता हे शेअर बाजारात काम करीत होते तसेच ते सोसायटीचे सेक्रेटरी देखील होते. मुलगा व सुन दोघेही मुंबईत नोकरी करीत होते. ८ जुलै सोमवार रोजी सकाळी साडे अकरा वाजता पिता-पुत्र भाईदर रेल्वे स्टेशनच्या ६ नंबरच्या प्लँटफाँर्मवर उतरले आणि नायगावच्या दिशेने संगनमताने चालत गेले.सम ोरुन विरारहून ते चर्चगेटकडे जाणा-या पटरीवर दोघे झोपले व लोकल ट्रेन खाली दोघांनी आत्महत्या करुन स्वतः संपवले. सदर घटनेमुळे मुंबईसह परिसर व अरव्वा महाराष्ट्र हादरला आहे.



आजवर ब-याच कर्तृत्ववान, समाजप्रबोधनकार, सुज्ञ, जाणकार अशा महानुभवांनी देखील आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. ज्यांना जीवनाचं सार माहीत आहे. अशा प्रभूतींवर सुध्दा आत्महत्या करण्याची दुर्दैवी वेळ आली. कला-दिग्दर्शन उच्च पातळीवर पोहचवणारे नितीन देसाई या उच्च विचारवंत माणसावर आत्महत्या करण्याची वेळ येते तेव्हा ही दुर्दैवी घटना ऐकणा-यांचे मन काही वेळेसाठी सुन्न नक्कीच होते. जीवन अनमोल.... यासारख्या तत्वज्ञानाच्या बाता अशा ठिकाणी पूर्णपणे स्टाँप करतात. कारण ज्या माणसाने समाजासाठी खूपकाही चांगले दिले. विशेष म्हणजे चित्रपटांमधून संकटांवर मात करुन जगण्याचे महत्व सांगितले अशा सर्वसंपन्न कला-दिग्दर्शकाला देखील आत्म हत्या करावी लागते याचे गांभिर्य व दखल नक्कीच घेणे गरजेचे आहे.

आध्यात्मिक गुरु भैयुजी महाराज जे सम ाजातील लाखो भाविकांना जगण्याचा मंत्र देत होते त्यांना देखील अंतरिच्या वेदनांमुळे १२ जून २०१८ रोजी मध्य प्रदेशातील इंदूर येथे स्वतःवर गोळी घालून आत्म हत्या करण्याची वेळ आली. अशा प्रकारे समाजप्रबोधन करणे, दुस-यांना जीवनाचा मार्ग दाखविणा-यांवरच आत्महत्या करावी लागण्याची परिस्थिती येते असेल तर मग काय म्हणावे? अर्थात आत्म हत्या करण्याची इच्छा खरतरं कोणाचीच नसते. कारण जीव सर्वांना प्रिय असतोच. पण परिस्थिती समोर तो जेव्हा तो हरतो आणि जेव्हा अनेक विचारांनी हैराण होते. मनःस्थिती बिघडते, काहीच सूचत नाही, काही गोष्टी कोणाजवळ मांडता देखील येत नाही. अशा परिस्थितीत सर्व संपल्याची भावना तयार होते आणि त्यातून स्वतःच संपविण्याशिवाय पर्याय नसतो.

सतत मोबाईलच्या अतिआहारी गेलेल्या मुला-मुलींनी घरच्यांनी ममोबाईल ठेव आणि अभ्यास करफ असा चांगला सल्ला व सूचना देणे देखील अपमानास्पद ठरुन आत्म हत्यासारख्या घटना घडत असतात. आई-वडिलांनी मुला-मुलींना शहाणपणा शिकवणे देखील चिंतेचा विषय ठरत आहे.

आत्महत्या करणा-याने आपले मन कोणाजवळ तरी हलके करायला हवे होते. संकटे येतच असतात म्हणून आत्महत्येचा मार्ग निवडणे योग्य नाही... अशा प्रकारच्या तत्वज्ञानाच्या चर्चांना नंतर उधाण येते. जो तो आपल्याजवळील उत्तम ज्ञानाचे गोडवे गात असतो. हे जरी खरे असले तरी नंतर मदतीचा हात पुढे करणे वगैरे वगैरे बाता करण्यात अर्थ नसतो. जो आत्महत्या करतो त्याची कारणे व परिणाम याची जाण त्याला असतेच. असे असले तरी मात्र आपल्यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्यांना त्रास होता कामा नये. ही विशेष भूमिकाही कदाचित असू असते. काही जण कर्जबाजारीपणामुळे, आर्थिक विवंचनेमुळे, नैराश्येमुळेवा वैफल्यग्रस्ततेमुळे, स्वतःकडून झालेल्या चुकांमुळे आत्महत्या करीत असतात. आपल्या आत्महत्येमुळे आपल्या कुटुंबाला किती यातना होतील? आत्महत्येमुळे जन माणसात आपल्या बद्दल किती? कोणते प्रश्न व शंका निर्माण होतील? याची चिंता असतानाही काही जणांसमोरील मार्गच बंद झाल्यामुळे छातीवर दगड ठेवून निर्णय घ्यावा लागतो.

राजेंद्र चौधरी
रोझोदा. ता, रावेर. जि. जळगाव
मो. ७७००९८२७६५

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ८ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# गंभीर गुन्हे असलेल्या ७० जणांना एसपी साहेबांनी बोलावून घेतले

बीड (प्रतिनिधी) :-पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी एकापाठोपाठ एक धडक ॲक्शन घ्यायला सुरूवात केली आहे. आठवडाभरापुर्वीच ५१ वाळू माफियांना बोलावून त्यांची परेड घेत पोलीसी खाक्यात समज दिल्यानंतर आता गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या गुंडांची बारी आल्याचे दिसुन येत आहे. जिल्हाभरातील पोलीस ठाण्यांच्या रेकॉर्डवर असलेल्या गंभीर गुन्ह्यातील ७० जणांना पोलीसअधिक्षक काँवत साहेब यांनी आज दुपारी बोलावून घेतले होते. गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असणा-या यापैकी काहींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येऊ शकते. याशिवाय ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत त्यांना समज देऊन यापुढे अशा प्रकारचे गुन्हे न करण्याबाबत



तंबी दिली जाण्याची शक्यता आहे. दुपारनंतर ही परेड होणार असल्याचे समजते. जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे असलेल्या रेकॉर्डवरील व्यक्तींना संबंधीत ठाणेप्रमुखांनी बोलावणे पाठवले आहे. त्या अनुषंगाने दुपारी उशिरापर्यंत अनेकजण पोलीस अधिक्षक कार्यालयात दाखल होत होते. दरम्यान आजच्या या परेडच्या माध्यमातून पोलीस अधिक्षक संबंधीत व्यक्तींना काय समज देतात ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ज्यांच्यावर गंभीर स्वरूपाचे गुन्हे वारंवार दाखल झालेले आहेत. त्यांच्यावर काही कारवाई होते का ? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे.

# माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त प्रेरणास्थळ येथे अभिवादन !!

नुकताच वरळी येथील स्मशानभूमी लगत असलेल्या त्यागमुर्ती रमाई माता प्रेरणास्थळ येथे साप्ताहिक भगवे वादळ चे संपादक दत्ता खंदारे, जेष्ठ पत्रकार व थोर समाजसेवक शशिकांत सावंत, प्रसिद्ध गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर आणि साहित्यिक व कवी



विलास देवळेकर यांनी माता रमाई यांच्या १२७व्या जयंती निमित्त फुले व हार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. ह्यावेळी शशिकांत सावंत यांनी थोडक्यात भाषण पर माता रमाई यांची महंती सांगितली. आणि शब्दश्री विलास देवळेकर यांनी माता रमाई वर कविता सादर केली.

# १२ वे अ.भा म . शेतकरी साहित्य संमेलनात माणदेश कवी डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची निवड

प्रतिनिधी – जगदीप वनशिव

कोल्हापूर– जिल्ह्यातील जयसिंगपूर येथे १२ वे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन आयोजित केले असून कवी संमेलनामध्ये माणदेश कवी डॉ लक्ष्मण हेंबाडे यांची निवड करण्यात आली आहे पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ता जयसिंगपूर येथे संपन्न होत आहे अशी माहिती संमेलनाचे कार्याध्यक्ष गंगाधर मुटे यांनी दिली शेतीमातीची अस्मिता जागृत ठेवण्यासाठी शेतकरी कवीसंमेलन आयोजित केले आहे जयसिंगपूर येथील सहकार महर्षी शामराव पाटील यड्रावकर नाट्यगृहात आयोजित केले आहे सर्व क्षेत्रातील साहित्यिक सामाजिक राजकिय



शैक्षणिक पत्रकार बंधूंना आग्रहाचे निमंत्रण देण्यात आले आहे शेतकरी जगाचा पोशिंदा जगाचा अन्नदाता आहे शेतकरी कुटुंबातील ग्रामीण भागातील कवी म्हणून पांदवाटकार डॉ लक्ष्मण हेंबाडे यांना अनेक पुरस्कार विजेते असून साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे परीक्षक म्हणून काम केले आहे साहित्यक्षेत्रामध्ये सतत कार्यरत असून शेतीमातीची नाळ सतत जपत आहेत यावर्षीच्या १२ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनामधील कवी संमेलनात त्यांची निवड करण्यात आली आहे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले आहे

# ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रीशताब्दी जयंती निमित्त शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी...

**पत्रकार भारत कवितके यांची मागणी.**

प्रमोद सूर्यवंशी मुंबई.

३१मे २०२५ रोजी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती ( त्रीशताब्दी) सर्वत्र जल्लोषात, उत्साहात साजरी होणार असून या दिवशी केंद्र व राज्य शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी,जेणे करून सर्वांना जयंती उत्सवात सहभागी होता येईल.' जे का रंजले गांजले/ त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा,/ संत तुकाराम महाराजांच्या या काव्याचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यात साक्षात्कार अनुभवास आल्याचे



जाणवते.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मानवता हा एकच धर्म मानला.लोकसेवा व राष्ट्रसेवा म्हणजे च खरे धार्मिक कार्य त्या मानीत असत. लोकांसाठी केलेले त्यांचे कार्य महान आहे.सामान्य माणसाला केंद्रस्थानी मानून त्यांनी कल्याणकारी कार्य केले. अशा या महान लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त केंद्र व राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी.अशी मागणी मुंबई कांदिवली पश्चिम येथील पत्रकार साहित्यिक गीतकार सामाजिक कार्यकर्ते भारत कवितके यांनी केली आहे.

# श्री.सरस्वती विद्या मंदिर भांडुप शाळेचा ४० वर्षांची यशोगाथा सांगता कार्यक्रम उत्साहात संपन्न

मुलुंड :(प्रदीप कासुर्डे )ङ्गइवलेसे रोप लावीयले द्वारींत्याचा वेलू गेला गगनावरीं या उक्तीप्रमाणे सिंधुदुर्ग एज्युकेशन सोसायटी संचलित श्री सरस्वती विद्या मंदिर भांडुप या शाळेची चाळीस वर्षाची वाटचाल ही दैदीप्यमान ठरली आहे.४० वर्षाची यशोगाथा या कार्यक्रमाचा सांगता समारंभ दिनांक ४ फेब्रुवारी रोजी कालिदास नाट्यगृह मुलुंड मुंबई येथे जल्लोषात पार पडला. १९८५ साली श्री.वसंत सावंत,सौ.वर्षा सावंत मॅडम व त्यांचे इतर सहकारी यांनी भांडुपमधील झोपडपट्टी व कष्टकरी विभाग असलेल्या टेबीपाडा नरदास नगर येथे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शाळेची स्थापना केली.५५ विदयार्थ्यांपासून सुरु झालेला हा प्रवास आज ४० वर्षानंतर ५००० पर्यंत पोहचला आहे.याचे सारे श्रेय जाते ते संचालक श्री. वसंत सावंत यांची दूरदृष्टी संचालिका व शाळेच्या माझी मुख्याध्यापिका सौ.वर्षा सावंत मॅडम यांची शिस्त, निष्ठा व कार्यक्षम नियोजन, शाळेला लाभलेला उत्तम व उपक्रमशील शिक्षकवर्ग,शाळेचे प्रशासन उत्तम रित्या चालवणारा कर्मचारीवर्ग, उत्तम विद्यार्थी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सदैव शाळेच्या उपक्रमात सहभागी होणारा पालक वर्ग होय. या सांगता सोहळ्यासाठी कमांडर मनोहर सुर्वे, म्हात्रे सर, श्री. वसंत सावंत सर,सौ. वर्षा सावंत मॅडम, सर्व विभागाचे मुख्याध्यापक तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.कोणत्याही शाळेच्या उत्कर्षात तीन घटक महत्वाचे असतात ते म्हणजे विद्यार्थी,शिक्षक,आणि पालक या शाळेला तीनही घटकाची उत्तम साथ मिळाली असल्यामुळेच आज संस्थेची प्रगती झालेली आहे.अशा भावना उपस्थित मान्यवरानी व्यक्त केल्या.४० वर्षपूर्ती निमित्त वर्षभर शाळेने उद्घाटन समारंभ,पालक उदबोधन -आई म्हणून घडताना,पालक स्पर्धा वक्तृत्व,गायन,स्मरणशक्ती,रांगोळी,मेहेंदी,रोपाला पाणी घालणे .खेळ पैठणीचा,पालक स्नेहसंमेलन,माजी विद्यार्थी मेळावा,अंतरंग उद्योजकांचे वंदन मातृभूमीला असे कार्यक्रम केले असून यात विद्यार्थी, पालक, माझी विद्यार्थी या सर्वांना सहभागी करून घेतले होते. सांगत कार्यक्रम ही अतिशय जल्लोषात पार पडला.कार्यक्रमाचे निवेदन किरण खोत सर व सुनीता गोळे मॅडम यांनी केले तसेच नाट्य कलाकार प्रशांत विचारे यांनी दिग्दर्शीत केलेल्या सुंदर अशा संगीत नृत्य कार्यक्रमाने नाट्यग्रहात जल्लोष निर्माण झाला.या कार्यक्रमात ही मोठया संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक, माजी विद्यार्थी सहभागी होते.या प्रसंगी दहावीच्या प्रत्येक बॅचमधील कौतुकास्पद कार्य करणा-या माजी विदयार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

# मान्यवरांचे हस्ते संपादक ज्ञानेश्वर लंगे मुकनायक पुरस्काराने सन्मानित

--माजलगाव /प्रतिनिधीः-

साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा मुकुनायक पुरस्कार काल दि. ६ फेब्रुवारी वार गुरूवार रोजी भव्य दिव्य कार्यक्रमात प्रकाशराज आंबेडकर, आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते देऊन माजलगाव येथे त्यांचा गौरव करण्यात आला. संपादक ज्ञानेश्वर लंगे यांनी अल्पावधीत गदर साप्ताहिकाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना हात घालून आपल्या वर्तमानपत्रात आवाज उठवला. जनतेच्या मनामध्ये गदर साप्ताहिकाने अल्पावधीत नाव कमावल आहे. या साप्ताहिकाच्या



कामाची दखल घेऊन माजलगाव येथील निर्भीड पत्रकार संघाने संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मुकुनायक पुरस्कार जाहीर केला होता. काल दिनांक ६ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालय येथे मोठ्या दिमाखात हा गौरव सोहळाआयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यामध्ये डॉ. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराजजी आंबेडकर माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके दलित पँथरचे दीपक केदार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये साप्ताहिक बीड गदर चे संपादक ज्ञानेश्वर लंगे यांना मूकनायक पुरस्काराणे सन्मानित केले. यावेळी माजल-गाव निर्भीड पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब आडागळे, परमेश्वर सोळंके, अमर साळवे,शेख हमीद, राजरत्न डोंगरे, सिद्धेश्वर गायकवाड, संतोष रासवे, विजय कापसे, अनिकेत भिलेगावकर, विजय डावरे, दिगंबर गिरी, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप कुलकर्णी, मार्गदर्शक प्रचंड सोळंके, मुंजा गाडेकर, बाल-साहेब उफाडे रामभाऊ यादव, रंजीत आडागळे, गणेश तौर, तेजस शिंदे, दत्ता जाधव आधी सदस्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

# पंकजा मुंडे कार्यकर्त्यांना का म्हणाल्या सुधरा रे?

बीड : बीड दौ-यावर आलेल्या राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारात आपल्या उत्साही कार्यकर्त्यांना मसुधराफ या शब्दात संयमाचा सल्ला दिला.मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. बैठक संपवून त्या निघत असताना कार्यालयाच्या परिसरात भाजपच्या पदाधिका-यांनी त्यांच्या सत्काराची तयारी केली होती. मुंडे यांनी अगोदर तर सत्कार घ्यायला नका दिला. मतुम्ही माझे किती वेळा सत्कार करणार?फ असा सवाल पंकजा



मुंडेंनी कार्यकर्त्यांना केला. त्यानंतर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर पंकजा मुंडेंनी सत्कार स्वीकारला, त्यावेळी काही कार्यकर्त्यांनी मताई तुम्हीच आमच्या पालकमंत्रीफअसे म्हणायला सुरुवात केली. यावेळी पंकजा मुंडेंनी कार्यकर्त्यांना करड्या आवाजात सुनावले. मआपले पालकमंत्री अजितदादा आहेत. हे लिहून ठेवा आणि लक्षात ठेवा. मी संपर्क मंत्री आहेफ असे सांगितले. यावरही काहींनी मआमच्यासाठी पालकमंत्री तुम्हीचफ असे म्हटल्यानंतर मंत्री पंकजा मुंडेंनी या उत्साही कार्यकर्त्यांना मअरे सुधरा रेफ असे सांगत संयमाचा सल्ला दिला.

# वैष्णवी भजनी मंडळाची भावपूर्ण भजन संध्या

ठाणे : वंदे मातरम संघातर्फे ठाणे, पाचपाखाडी येथे दर वर्षी प्रमाणे सात दिवसांच्या माघी गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी भरलेल्या या उत्सवात विविध व्याख्याने आणि कलाप्रकार अव्याहतपणे सुरू आहेत. उत्सवाच्या चौथ्या दिवशी, ४ फेब्रुवारी रोजी, वैष्णवी भजनी मंडळाच्या वतीने भक्तिमय भजन संध्येचे आयोजन करण्यात आले. सौ. आरती लेले, सौ. क्षमा उपाध्ये, सौ. जोशी, सौ. ओक आणि त्यांच्या सहका-यांनी सुमधुर भजन सादर करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात न्हाऊ घातले.




गणरायाच्या चरणी अर्पण केलेल्या या भक्तिगीतांनी वातावरण मंत्रमुग्ध झाले होते. या भजन सायंकाळी सीए निखिलेश सोमण यांनी तबला आणि पेटीवर सुंदर साथसंगत केली. भजनाच्या सुरेल स्वरांनी आणि संगीताच्या सुरावटींनी संपूर्ण मंडप भक्तिमय उत्साहाने भरून गेला होता. वंदे मातरम संघाच्या माघी गणेशोत्सवातील हा भक्तिरसाचा कार्यक्रम उपस्थित भाविकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला. वंदे मातरमब संघाचे संस्थापक श्री संदीप केले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम संपन्न झाला.

# श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

केज/ प्रतिनिधी

श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुल येथे मोठ्या उत्साहात स्नेहसंमेलन झाले संपन्न झाले.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा ह.भ.प.ईश्वरजी मुंडे सर, या कार्यक्रमाचे उद्घाटक सुरेश तात्या पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रा.हनुमंत भोसले सर, कानडी माळी चे सरपंच अशोक राऊत, साबल्याच्या सरपंच जनाबाई काकडे,सरपंच विष्णू थोरात, माजी सरपंच दिनकर चाटे, होळचे ग्रामपंचायत सदस्य हनुमंत घुगे, माजी. सभापती नारायण बप्पा घुले, सुदाम पालकर सर, माजी चेअरमन श्रीकांत घुले, अशोक



चाळक, ज्येष्ठ पत्रकार धनंजय कुलकर्णी, अशोक नागरगोजे, वसंत सोनवणे, तात्या गवळी, मुबाशीर खतीब यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रसह विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार बांधव बांधव तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना ईश्वरजी मुंडे यांनी गुरुकुल याविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. पुढे बोलताना मुंडे म्हणाले की, श्रीराम प्रभू,लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांनाही गुरुकुल मध्ये शिक्षण घेण्यासाठी त्याकाळी पाठवले होते तसेच आताच्या आधुनिक काळात गुरुकुल विषयी शाळेतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना व्यसनापासून मुक्त व्हावे व व्यसनाच्या आहारी जाऊ नये याचे शिक्षण दिले पाहिजे व मोबाईलचा अतिवापर टाळला पाहिजे शाळेची शिक्षकाची व पालकाचे जबाबदारी आहे असे मत प्राचार्य ईश्वर मुंडे सर व्यक्त केले आहे. यावेळी विद्यार्थी व उपस्थित पालकांना भोसले सर यांनी मोलाचा सल्ला दिला आहे. यावेळी साबल्याच्या सरपंच जनाबाई काकडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या. तर सुरेश तात्या पाटील यांनीही श्री संत ज्ञानेश्वर गुरुकुलचे संस्थापक सचिव दादासाहेब कराड यांना या संस्थेचे रूपांतर वटवृक्षात व्हावे अशा शुभेच्छा दिल्या व सदैव आम्ही आपल्या सोबत आहोत अशा शुभेच्छा देऊन लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी थोडक्यात मनोगत व्यक्त करून मान्यवरांनी छोट्या चिमुकल्या मुलांचे कौतुक पाहण्यासाठी मान्यवरांनी बक्षीस रूपात त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले.

# आता तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात जाण्याची गरज नाही

----बीड /प्रतिनिधी :- अन्याय झाला तरी नागरिकांना पोलीस ठाण्यात येऊन तक्रार करायची म्हटलं की मोठं दिव्य पार करावं लागतं. त्यामुळे कित्येकदा तक्रारदार हे ठाण्यात जाण्याचंच टाळतात. मात्र आता पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी मोठा निर्णय घेतला असून नागरिकांना टठ कोडच्या माध्यमातून तक्रार करता येणार आहे.बीड जिल्ह्यात नागरीक हे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात राहतात. त्यामुळे बहुतांश वेळा त्यांना पोलीस स्टेशनशी संबंधीत काम असेल तर त्यांना पोलीस स्टेशनला पोहचायला बराच वेळ लागतो. त्याच बरोबर पोलीस स्टेशनला पोहचण्यासाठी बस भाडे/स्वतःचे वाहन असल्यास इंधन खर्च या स्वरुपात पैसाही खर्च होतो.

पोलीस स्टेशनला गेल्यानंतर ब-याच वेळा काम होत नाही. किंवा नागरीकांचे समाधान होत नाही. त्यामुळे नागरीकांना वरीष्ठांकडे दाद मागण्यासाठी दुरचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे नागरीकांचे आर्थीक नुकसान तर होतेच परंतु त्याच बरोबर त्यांना शारिरीक व मानसीक हालही होतात. याच बाबींचा विचार करुन व नागरीकांना चांगली सेवा देण्याच्या भावनेतुन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो. से.) यांचे संकल्पनेतुन



संवाद प्रकल्पफ हा उपक्रम बीड जिल्हा पोलीस दलात राबवला जात आहे. यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो.से.) यांनी टठ उेवश तयार केला आहे. सदरचा टठ उेवश हा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांचे कक्षात व पोलीस ठाणे उेवश तयार केला आहे. सदरचा टठ उेवश हा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांचे कक्षात व पोलीस ठाणे अंमलदार यांचे कक्षात लावण्यात आला आहे.

नागरीकांनी आपल्याकडे असलेल्या मोबाईलद्वारे सदरचा टठ उेवश स्कॅन केल्यानंतर त्यांच्या मोबाईलचे स्क्रिनवर एक लिंक येईल. ती लिंक उघडल्यानंतर एक माहीतीचा फॉर्म येईल. त्यामध्ये नागरीकांना स्वतःचे नाव, मोबाईल क्रमांक, ज्या पोलीस ठाण्याच्या संबंधी काम आहे त्या पोलीस ठाण्याचे नाव निवडणे, पोलीस ठाणे येथे भेट देण्याचे कारण किंवा माहीती, पोलीस ठाणे येथे भेट दिल्यानंतर किंवा पोलीस ठाण्याच्या कामकाजावर आपण समाधानी आहात काय? समाधानी असमाधानी असल्याचे कारण, तुम्ही दिलेली भेट यावरुन पोलीस ठाणेस किती गुण द्याल? (गुण १-५), सुधारणेसाठी सुचना इत्यादी माहीती भरुन ती सबमीट करणे आवश्यक राहील. एखादी व्यक्ती पोलीस स्टेशनच्या कामकाजाबाबत असमाधानी असल्यास त्यांची पोलीस अधीक्षक कार्यालयाकडुन २४ तासांच्या आत समस्या जाणुन घेवुन समाधान करण्याचा प्रयत्न केला जाईल.सदरचा सुद्धा नागरीकांपर्यंत पोहचवला जाणार आहे. त्यामुळे एखाद्या नागरीकास अवैध धंदे किंवा इतर महत्वाची गोपनीय माहीती द्यायची असेल तर ते सदरचा टठ उेवश स्कॅन करुन माहीती देवु शकतात. अशा व्यक्तींचे नांव व मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवले जाईल. तसेच याद्वारे नागरीकांना त्यांच्या काही तक्रारी असल्यास त्या टठ उेवश द्वारे देवु शकतात. नागरीकांनी केलेल्या तक्रारी, दिलेल्या प्रतिक्रीया, सुचना ह्या पोलीस अधीक्षक हे स्वतः पाहु शकणार आहेत. तसेच नागरीकांनी केलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल पोलीसांकडुन घेतली जाणार आहे.या उपक्रमाद्वारे पोलीस आणि नागरीक यांच्यात समन्वय साधाला जाणार आहे. यापुढे नागरीकांना विनाकारण पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालयात चक्करा मारण्याची आवश्यकता नाही. यामुळे नागरीकांचा वेळ व पैशांचा होणारा अपव्यय टाळता येणार आहे. सदरचा उपक्रम हा नागरीकांच्या सेवेसाठी राबवीण्यात येत आहे.

दरम्यान, मसंवाद प्रकल्पफ हा उपक्रम आज दिनांक ०६/०२/२०२५ रोजी पासुन बीड जिल्ह्यात राबवीला जात आहे. सदर उपक्रमाचा नागरीकांनी योग्य उपयोग करुन पोलीस व नागरीकांमध्ये निर्माण झालेली दरी दुर करावी.तसेच नागरीकांनी सुचवीलेल्या सुधारणांचे स्वागत केले जाईल असे मत पोलीस अधीक्षक नवनीत काँवत (भा.पो. से.) यांनी व्यक्त केले आहे.

## या कवयित्रीला प्राप्त झाला मोठा पुरस्कार


सन्मानपत्र
मा.सुवर्णा शशिकांत तावरे
आपण करत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक, राजकीय, वैद्यकीय, पत्रकारिता, उद्योजक, विधी, अभिनय, दिग्दर्शन क्षेत्रातील आपल्या गौरवपूर्वक व उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन आपणास **राजमाता जिजाऊ-क्रांतीज्योती सावित्रीमाई समाजभूषण राज्यस्तरीय पुरस्काराने** सन्मानित करण्यात येत आहे आपले मनःपूर्वक अभिनंदन.
आपण कार्य करत असलेल्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल हे सन्मानपत्र आपणास सन्मानपूर्वक देण्यात येत आहे. यापुढेही असेच समाजपयोगी कार्य आपल्याकडून घडत राहो, आपल्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळो, यापुढेही आपले कार्य अतिशय जोमाने करण्याचा दृढ निश्चय करण्याची ऊर्जा तुम्हाला मिळो ह्या शुद्ध हेतूने हा पुरस्कार आपणास सन्मानाने प्रदान करण्यात येत आहे.
आपले पुनश्च एकदा **अभिनंदन !**
BhaleraoS.R.
प्रा. सुरेखा भालेराव

सुवर्णनगरी विटा येथील यंत्रमाग व्यावसायिक कुटुंबातील कवयित्री म्हणून नावारुपाला आलेल्या सुवर्णा तावरे यांना साहित्य क्षेत्रातील मोठा सन्मान प्राप्त झाला.प्रख्यात लेखिका, कवयित्री सौ. सुवर्णा शशिकांत तावरे यांना मानवतावादी बहुउद्देशीय मंडळ अखंड मराठी न्यूज आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या संयुक्त जयंती उत्सवनिमित्त देण्यात येणारा राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार मिळाला.पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सुवर्णा शशिकांत तावरे यांनी घरच्या बहुसंख्य जबाबदारी पेलत साहित्य, काव्य,चारोळ्या लिखाणाचा छंदही अगदी लीलया जोपासला,पेलला आहे . त्यांच्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना बहाल करण्यात आला आहे.देवांग समाज विटा, हजारे मळा परिसरातील नागरिक व कला अकादमीच्या वतीने सुवर्णा शशिकांत तावरे यांचे अभिनंदन करण्यात आले.त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# रेल्वे विषयी धारूर-वडवणी तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी घातले डॉ. प्रितमताई मुंडे यांना साकड

## सर्व विभागाची संयुक्त बैठक बोलवण्यासाठी प्रितमताईंचे पंकजाताईसह संबंधितांना पत्र

दिंद्रुड - नगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील वडवणी आणि धारूर तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांची भेट घेतली. रेल्वे प्रकल्पाकरिता संपादित करण्यात आलेल्या जागेची संपादन प्रक्रिया तसेच मावेजा संदर्भात उद्भवत असलेल्या समस्या यावेळी शेतकऱ्यांनी प्रितमताई मुंडे यांच्या समक्ष मांडल्या. बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा असलेला नगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असताना वडवणी आणि धारूर तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांमुळे प्रकल्पाचे काम मंदावले होते. भूसंपादन प्रक्रियेत वारंवार उद्भवनाऱ्या अडचणी तसेच मावेज्या संदर्भातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी प्रितमताईंची भेट घेऊन समस्या सोडवण्यासाठी



साकडे घातले. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्यानंतर डॉ.प्रितमताई मुंडे यांनी यासंदर्भात राज्याच्या पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आपल्या स्तरावरून सर्व संबंधितांना संयुक्त बैठक आयोजित करण्याच्या सूचना करण्याची विनंती केली आहे.तसेच स्थानिक उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांशी प्रितमताई मुंडे यांनी दूरध्वनीद्वारे संवाद साधून शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले. या रेल्वे प्रकल्पाला गती देण्यासाठी जिल्ह्याच्या महसूल, भूसंपादन, रेल्वे आणि कृषी विभागाने प्रकल्पक्षेत्र असलेल्या गावांमध्ये संयुक्त बैठक आयोजित करून शेतकऱ्यांच्या भूसंपादन आणि मावेज्यासंदर्भातील अडचणीचा जागेवर निपटारा करावा अशी मागणी देखील प्रितमताई मुंडे यांनी केली. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रितमताई मुंडे यांनी होणाऱ्या संयुक्त बैठकीस उपस्थित राहावे असा आग्रह याप्रसंगी शेतकऱ्यांनी त्यांना केला, प्रितमताईंनी घेतलेल्या भूमिकेमुळे लवकरच आम्हा सर्वांच्या समस्या सुटतील आणि प्रकल्पाला गती मिळेल अशा भावना यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या

## साहित्यामुळे समाजात सकारात्मक बदल - संदीप लेले

साहित्यामुळे समाजात सकारात्मक बदल होतो. त्यामुळे साहित्यिक चळवळ अखंड सुरू राहिली पाहिजे, यामुळेच वाचनसंस्कृती अधिक वृद्धिंगत होते, असे मत वंदे मातरम संघाचे संस्थापक अध्यक्ष संदीप लेले यांनी व्यक्त केले. वंदे मातरम संघातर्फे आयोजित माघी गणेशोत्सव मंडपात संपन्न झालेल्या ङ्गहृदयी वसंत फुलतानाफ या सांस्कृतिक कार्यक्रमात ते बोलत होते. या निमित्ताने त्यांनी साहित्य वाचणा-या आणि लिहिणा-या प्रत्येकाच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. ते पुढे म्हणाले, ङ्गसाहित्य हे केवळ करमणुकीचे साधन नाही, तर समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य त्यात असते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी आयोजकांचे आणि कलाकारांचे कौतुक केले. या कार्यक्रमात प्रा. अशोक बागवे, प्रा. डॉ. संतोष राणे, प्रा. प्रज्ञा पंडित, दिव्यांग गायक शुभम आणि मनिष पंडित या नामवंत साहित्यिक व कवींनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. तेजस्वी एंटरटेनमेंट प्रस्तुत या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे वंदे मातरमब संघातर्फे हा लोकप्रिय कार्यक्रम विनामूल्य असल्याने मोठ्या प्रमाणावर ठाणेकर रसिक उपस्थित होते. वंदे मातरम माघी गणेश जयंती उत्सव मंडळ, पाचपाखाडी, ठाणे यांनी या काव्यमय सांस्कृतिक सोहळ्याचे यशस्वी आयोजन केले. साहित्य आणि संगीताचा हा संगम पुढील वर्षीही मोठ्या उत्साहात साजरा होईल, अशी भावना प्रेक्षकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे समन्वयन वंदे मातरम संघाचे धार्मिक आणि कार्यक्रम विभाग प्रमुख सीए निखिलेश सोमण यांनी केले.





## वांद्रे येथील पहिल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष एकनाथ आव्हाड

ता. ०६ मुंबई वांद्रे येथील १०७ वर्षाची समृद्ध परंपरा लाभलेल्या नॅशनल लायब्ररी आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आयोजित पाहिले एक दिवसीय बालकुमार साहित्य संमेलन सोम वार दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत साजरे होणार आहे. नॅशनल लायब्ररीच्या सभागृहात वांद्रे येथील बी.पी.ई शाळेचे विद्यार्थी गणेश वंदना व छत्रपती शिवरायांना मानवंदना देणार असून संमेलनाचे उद्घाटन माहिती, तंत्रज्ञान, सांस्कृतिक मंत्री मान. ॲड आशिषजी शेलार यांच्या हस्ते होणार असूनसंमेलनाध्यक्ष साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कारप्राप्त लेखक मान. एकनाथ आव्हाड आहेत. तर स्वागताध्यक्ष सुप्रसिद्ध अभिनेत्री मा. नयना आपटे या आहेत. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून मान. प्रशांत पाटील (जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ठाणे), मान. संजय बनसोड (जिल्हा ग्रंथालय अधिकारी मुंबई उपनगर), मान. जयु भाटकर (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ), मान. शेखर सामंत (सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ), मान. भानुदास केसरे (मुख्याध्यापक बी.पी.ई. शाळा), मान. दिपक पडवळ (अध्यक्ष नॅशनल लायब्ररी, वांद्रे), मान. प्रमोद महाडिक (प्रमुख कार्यवाह नॅशनल लायब्ररी, वांद्रे) उपस्थित राहणार आहे.



सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.पी. ई शाळेच्या विद्यार्थिनी शर्मिन शेख आणि रिदा मणियार करणार आहेत. सुप्रसिध्द बालसाहित्यकार आणि प्रकाशिका मान. ज्योती कपिले ह्या कवी संमेलनाच्या अध्यक्ष असूनमान. सदानंद पुंडपाळ (कोल्हापूर), मान. रविंद्र सोनवणे (जळगाव), मान. प्रतिभा जगदाळे (सांगली), मान. श्रीकांत पेटकर (कल्याण), मान. वीरभद्र मिरेवाड (नांदेड), मान, मोहन काळे (नवी मुंबई), बी.पी.ई शाळा आणि अनुयोग विद्यालयचे विद्यार्थी यांचा सहभाग आहे.

दुस-या सत्रात नाट्यसंस्कार कला अकादमी, पुणे निर्मित संध्या कुलकर्णी लिखित आणि प्रसाद कुलकर्णी दिग्दर्शित जीर्णोध्दारफ हे अनेक पारितोषिके पटकवणारे बालनाट्य सादर केले जाणार आहे. कथाकथन सत्राचे अध्यक्ष सुप्रसिद्ध कथाकार आणि कथाकथनकार मान. विलास सिंदगीकर असून मान. रंजना सानप (सातारा) मान. बबन शिंदे (हिंगोली) मान. मेघना साने (ठाणे) मान. सतीश चिंदरकर (खार पूर्व) कथा सादरीकरणः कुमार. विजार खांबये (अनुयोग विद्यालय) कुमार सर्वेश ठोटम (अनुयोग विद्यालय) कुमारी मनश्री राणे (अनुयोग विद्यालय) यांचा सहभाग आहे.

## विक्रेत्यांचे आंदोलन विजयी! लॉटरी बंदीचा निर्णय अखेर मागे घेतला!

मुंबई दि. (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य लॉटरी च्या बंदीचा निर्णय अखेर मागे घेण्यात आला असून नव्या सोडतीची छपाई लवकरच सुरू होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य लॉटरी तोटयात आहे म्हणून मार्च २०२५ नंतर छपाईचे काम थांबविण्यात आले होते त्यामुळे लाखों विक्रेते व त्यांचे कुटुंबिय यांच्यावर बेरोजगारीची टांगती तलवार होती. अखेर विक्रेत्या संघटनेने केलेल्या पध्दतशीर आंदोलनामुळे सरकारला लॉटरी बंदीचा निर्णय रद्द करावा लागला.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, शिवसेना नेते श्री उध्दवजी ठाकरे, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते, अंबादास दानवे यांची भेट घेऊन संघटनेने लॉटरी वाचविण्यासाठी मागणी केली. प्रशासनाने सोयीचा अर्थ लावून आकडे फुगविले आहेत हे आकडेवारीच्या आधारे मांडले होते.



दादर येथे लॉटरी विक्रेत्यांचा लॉटरी बचाव मेळावा तसेच पत्रकार परिषदा यातूनही सरकारचे लक्ष हे वेधण्यात आले होते.लॉटरीची छपाई ही परराज्यात होते त्यामुळे तिकिटे विलंबाने मिळतात. ही छपाई राज्यातच करावी अशी ही मागणी विक्रेत्यांचे नेते सातार्डेकर यानी केली होती. त्याला ही मान्यता मिळाल्याचे समजते. लॉटरीला अभय दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार संघटनेतर्फे मानण्यात आले आहे.हा विजय लॉटरी विक्रेत्यांचा आहे ! एकजुटीचा आहे! अशी प्रतिक्रिया संघटनेचे युवा अध्यक्ष श्री. सुमित सातार्डेकर सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, मुंबई अध्यक्ष विनोद गाडेकर, ठाणे जिल्हाध्यक्ष महेश कोळी यानी व्यक्त केली आहे. लॉटरी ट्रेड एजेंट एसोसिएशन /रोजगार बचाओ समिती नी ही या मागणीसाठी पाठपुरावा केला होता.

## रुग्णसेवेच्या क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करा

# डॉ.अशोक थोरात यांचे प्रतिपादन; माऊली नर्सिंग महाविद्यालयात शपथग्रहण सोहळा

बीड । प्रतिनिधी आज तुम्ही सर्वजण रुग्णसेवेची शपथ ग्रहण करत आहात. पुढे चालून या क्षेत्रातील सेवेतून आपली वेगळी ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी केले. बीड शहरातील धानोरा रोडवरील माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजीत शपथग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. माऊली नर्सिंग महाविद्यालयात विद्यार्थीनींच्या शपथग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, काँग्रेस नेते रविंद्र दळवी, राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे, मेट्रन रमा गिरी, इंजि.रविंद्र तोंडे, पोलिस निरीक्षक खेडकर, डॉ.अनिल सानप, डॉ.सचिन आंधळकर, डॉ.अनंत मुळे, डॉ.चोले, भाजपा नेते अजय सवाई, डॉ.वर्षा तिडके, अनिल चांदणे, भैय्या मोरे, डॉ.लक्ष्मण जाधव, विनोद मुळुक, अनिल राठोड, रणजित बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी फलोरेन्स नाईटींगेल यांचे प्रतिमापुजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे यांनी केले. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठीच आपण कार्य करत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अशोक थोरात यांनी मी गत पंचवीस वर्षांपासून रुग्णसेवेत आहे. या क्षेत्रात



कौशल्यपूर्ण कामाच्या आधारावर एक वेगळी ओळख निर्माण करु शकलो आहे. तुम्ही देखील सेवा क्षेत्रात आहात त्यामुळे एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी प्रामाणिक कार्य करत रहा असे मार्गदर्शन विद्यार्थीनींना केले. यावेळी राष्ट्रवादीचे नेते कल्याण आखाडे यांनी महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात डॉ.महादेव मुंडे महत्त्वाचे योगदान देत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना विविध अभ्यासक्रम त्यांनी बीडमध्ये उपलब्ध करुन दिले असून यामुळे या विद्यार्थीनी स्वतःच्या पायावर उभा राहू शकणार आहेत. तर काँग्रेसचे नेते रवि दळवी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की सध्याच्या स्पर्धेच्या काळात नर्सिंग क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. अगदी भारतात आणि भारताबाहेर देखील या क्षेत्रात रोजगार मिळू शकतात असे सांगितले. यावेळी सुभाष धस यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.संगीता मुंडे यांनी केले. यावेळी मान्यवरांचे स्वागत प्राचार्य वृंदावनी कांबळे, प्राचार्य धनंजय मेडकर, उपप्राचार्य शुभम जोगदंड, यांनी केले. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थीनीसह महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होत

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com